महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 2167
दिनांक: २३/१०/२०१९
२४

प्रति,

प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त क.महाविद्यालये,(सातारा,सांगली,कोल्हापूर.)

विषय: **फेब्रु.-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फेब्रु.-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र,कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने दि. ०३ /१०/२०१९ ते २३/ १०/२०१९ तसेच व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी **(Hsc Vocational Stream)** व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. २४ /१० /२०१९ ते ३१/१०/२०१९ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि.०१ /११ /२०१९ ते ०८/११/२०१९ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरभरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

<table>
<tr><td>शुल्क प्रकार</td><td>उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी , यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा</td><td>उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा</td></tr>
<tr><td>नियमित शुल्क</td><td>गुरुवार दि. ०३/१०/२०१९<br>ते<br>शुक्रवार दि. १५/११/२०१९</td><td rowspan="2">शुक्रवार<br>दि. ०१/११/२०१९<br>ते<br>मंगळवार<br>दि.२६/११/२०१९</td></tr>
<tr><td>विलंब शुल्कासह</td><td>शनिवार दि.१६ /११/२०१९ ते सोमवार दि.२५ /११/२०१९<br>( सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत )</td></tr>
</table>

.....२/-

आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी Pre-list Print करुन विद्यार्थ्यांमार्फत आवेदन पत्रातील सर्व माहीती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावीत. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या Link वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

२) सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयानी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बॅंकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्याच्या यादया दिलेल्या मुदतीतच सबंधीत विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

३) नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारे भरण्यात यावेत.

४) आवेदन पत्रासोबत नियमित / विलंब शुल्क भरल्याशिवाय संबधितांचा निकाल जाहीर केला जाणार नाही याची नोद घ्यावी.

**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाने निश्चित केलेल्या बॅंकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या व Pri-List गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर,२०१९ रोजी आपल्या जिल्हयाच्या निर्धारित वितरण केंद्रावर जमा कराव्यात.**

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

- **जिल्हा वितरण केंद्रासाठी सूचना : वितरण केंद्रानी वरीलप्रमाणे जमा झालेले साहित्य विहीत नमुन्यात तालुकानिहाय नोंद करुन शनिवार दिनांक ३०.११.२०१९ रोजी कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर विभागीय कार्यालयाकडे जमा करावयाच्या आहेत**